# भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीची भूमिका:एक अभ्यास

प्रा.सुरेश कृष्णा नामदास
अर्थशास्त्र विभाग,डी.बी.जे.कॉलेज,चिपळूण.
तालुका–चिपळूण जिल्हा रत्नागिरी–415605

## प्रस्तावना:

भारत हा कृषिप्रधान देश आहे.भारतीय अर्थव्यवस्थेचा शेती हा कणा आहे.भारतातील साधारणपणे 65 टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावर अवलंबून आहे.भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था मानली जाते. अलीकडच्या कालखंडामध्ये शेती उद्योगा बरोबर औद्योगिक व सेवा क्षेत्र यांचा विकास होताना आढळून येतो. परंतु शेती क्षेत्राच्या विकासाकडे दुर्लक्ष करता येत नाही कारण कृषी व्यवसाय हा अजूनही देशातील सर्वात मोठा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात विविध आकडेवारीवरून असे दिसून येते की शेती क्षेत्राचा वाटा सातत्याने कमी होत आहे. स्वतंत्र भारताचे कृषी मंत्री स्वर्गीय डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी भारतीय शेतीची दुरावस्था ओळखून असे म्हटले होते की "कृषी संस्कृती हीच खरी संस्कृती ची जननी आहे "भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्र हा आत्ता मोठा व्यवसाय मानला जातो. परंतु अलीकडे शेती क्षेत्राची अवस्था ही इतर क्षेत्राच्या तुलनेने घसरत चाललेली आहे. प्रस्तुत संशोधन लेखांमध्ये ग्रामीण अर्थव्यवस्थेतील भारतीय शेतीची भूमिका यावर भाष्य करण्याचा अग्रक्रमाने प्रयत्न केलेला आहे.

## उद्दिष्टे–

1)राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा व बदलत्या प्रवृत्तीचा अभ्यास करणे.
2)भारतीय शेतजमिनीची उत्पादकतेचा अभ्यास करणे.
3)भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेच्या कारणाचा अभ्यास करणे.
4)भारतीय शेती क्षेत्रात सुधारणा होण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

## संशोधन पद्धती–

प्रस्तुत शोधनिबंधात दुय्यम साधन सामुग्रीचा अवलंब केला आहे.

## राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा

भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रमुख्याने तीन क्षेत्राचा समावेश होतो. प्राथमिक , दुय्यम व तृतीय क्षेत्र समग्ररीत्या देशाच्या आर्थिक विकासाची पातळी दर्शवतात. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा पुढील तक्त्यामध्ये दर्शविलेला आहे.

राष्ट्रीय उत्पन्नातील (जी.डी.पी.)विविध क्षेत्रांचा हिस्सा(%)

| वर्ष/ क्षेत्र | प्राथमिक क्षेत्र | उधोग क्षेत्र | सेवा क्षेत्र |
|---|---|---|---|
| 1950-51 | 54.4 | 28.8 | 14.8 |
| 1960-61 | 54.8 | 16.6 | 28.6 |
| 1970-71 | 43.3 | 216 | 32.1 |
| 1980-81 | 39.2 | 23.7 | 36.6 |
| 1990-91 | 32.2 | 27.2 | 40.6 |
| 2000-01 | 24.0 | 26.7 | 49.3 |
| 2010-11 | 17.2 | 26.4 | 56.4 |
| 2012-13 | 13.7 | 27.0 | 59.3 |

स्रोत: भारतातील आर्थिक पाहणी 2011-12, 2012-13

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की 1950-51 मध्ये शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा 54.4 वरून 2012-13 मध्ये 13.7 इतका कमी झाला आहे. त्याचबरोबर उद्योग सेवा क्षेत्राचा अनुक्रमे 28.8 व 14.8 टक्के इतका होता तो 2012-13 मध्ये अनुक्रमे 27.0 वं 59.3 टक्के मात्र वाढलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तुलनात्मक सेवाक्षेत्राचा जास्त वाढलेला आहे. यावरून असे स्पष्ट होते की शेती क्षेत्राचा हिस्सा घटताना उद्योग आणि सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढलेला आहे. परंतु तुलनात्मक दृष्ट्या व्यापार क्षेत्राचा हिस्सा झपाट्याने वाढलेला आहे.

शेतजमिनीची उत्पादकता

जमिनीची उत्पादकता म्हणजे शेती व्यवसायातून मिळालेले एकूण उत्पन्न आणि लागवडीखाली असलेले एकूण क्षेत्र याचे गुणोत्तर होय.जमिनीची उत्पादकता म्हणजे सरासरी उत्पादकता होय.

पुढील तक्त्यामध्ये 1950-51 ते 2011-22 या कालावधीमधील भारतीय शेतीची उत्पादकता विविध अन्नधान्य उत्पादनाच्या संदर्भात दर्शवलेली आहे.

शेतजमिनीची उत्पादकता (000टन)

| पिके/वर्ष | 1950-51 | 1960-61 | 1990- 91 | 1999-2000 | 2011-12 |
|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | 668 | 1013 | 1740 | 1740 | 1990 |
| गहू | 663 | 851 | 2281 | 2281 | 2775 |
| ज्वारी | 353 | 533 | 814 | 814 | 852 |
| बाजरी | 288 | 286 | 658 | 658 | 39 |
| हरभरा | 482 | 674 | 712 | 712 | 806 |
| शेंगदाणे | 775 | 745 | 904 | 904 | 744 |
| ऊस | 33422 | 45549 | 66069 | 66069 | 70780 |
| कापूस | 86 | 125 | 216 | 216 | 226 |

स्त्रोत: भारतातील आर्थिक पाहणी 2011-12, 2012-13

विविध अन्नधान्याच्या एकूण उत्पादनाच्या माध्यमातून असे स्पष्ट होते की 1950-51 मध्ये तांदूळ उत्पादनामध्ये 66.8 दशलक्ष टनापासून 2011-12 मध्ये 199.0 दशलक्ष टन इतकी वाढ झाली आहे. गव्हाच्या उत्पादनात सुद्धा 66.3 दशलक्ष टन पासून 277.5 दशलक्ष टन एवढी वाढ झालेली आहे. त्याचबरोबर ज्वारी, बाजरी, हरभरा व शेंगदाणा यांच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. लक्षणीय बाब म्हणजे ऊस उत्पादनाच्या बाबतीत प्रचंड वाढ झालेली आहे. परंतु कापूस फारशी उत्पादनात वाढ झालेली आढळून येत नाही. अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत फारशी वाढ आढळून येत नाही परंतु काही व्यापारी पिकाच्या उत्पादन संदर्भात मात्र उदा.ऊस उत्पादन यामध्ये प्रचंड वाढ आढळून येते.

भारतीय शेतीची तुलनात्मक उत्पादकता

जगातील विकसित देशांची तुलना करता भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. 2012 मध्ये अमेरिकेत दर हेक्टरी तांदळाचे उत्पादन 83.49 क्विंटल आणि इजिप्तमध्ये 97.2 क्विंटल इतके होते. तर त्या तुलनेत भारतात ते खूपच कमी होते. गहू या पिकाचा विचार करता इजिप्तची भारतापेक्षा जवळपास दुपटीने अधिक होती.

भारतीय शेतीच्या समस्यांचा कमी उत्पादकतेची कारणे-

1) जमिनीची धूप-

भारतातील शेत जमिनीचे मोठ्या प्रमाणात धूप होते. शेत जमिनीची धूप होण्याचे कारण म्हणजे सूर्याच्या उष्णतेमुळे जमिनीची धूप होते. तसेच वाऱ्यांमुळे व पावसाच्या व पुराच्या पाण्यामुळे जमिनीचा वरचा थर वाहून जातो. त्यामुळे जमिनीची उत्पादकता घटते.

2) जमिनीचे लहान आकारमान-

भारतातील शेत जमिनीचे सरासरी आकारमान लहान व आर्थिकदृष्ट्या परवडणारे आहे. भारतात सुमारे 85 टक्के जमिनीचे सरासरी आकारमान 4 हेक्टर पेक्षा कमी आहे. जमिन आकारमान आर्थिकदृष्ट्या किफायतशीर नाही. त्यामुळे शेतीत आधुनिक प्रयोग करून उत्पादकता वाढविता येत नाही. पर्यायी शेती उत्पादन कमी राहते.

3) श्रमिकाची कमी उत्पादकता–

शेतकरी व शेतमजुरांची उत्पादनक्षमता कमी आहे. कारण जमीनीवर अतिरिक्त लोकसंख्येचा भार अधिक आहे. तसेच शेतकरी व शेतमजूर व अकुशल आहेत. अतिरिक्त श्रमिकांची सीमांत उत्पादन क्षमता शून्य आहे. पर्यायी श्रमिकांच्या कमी उत्पादन क्षमतेमुळे शेतीची उत्पादकता सुद्धा कमी राहण्यास नकारात्मक पद्धतीने मदत होते.

4) जलसिंचन सुविधांचा अभाव –

भारतातील 32 टक्के जमिनीला जलसिंचन सुविधा उपलब्ध आहेत. उर्वरित 58 टक्के शेती पावसावर आधारित आहे .भारतात शेती हा एक जुगार म्हणून ओळखला जातो. कारण भारतीय शेती ही पूर्णतः पावसावर आधारित आहे. पाऊस हा अतिरिक्त ,अनियमित व कमी या स्वरूपात पडतो. त्या सर्वांचा प्रतिकूल परिणाम शेतीची उत्पादकता घटण्यास मदत होते.

5) सुधारित बी बियाणे व खतांच्या वापराचा अभाव–

भारतीय शेतीमध्ये जास्त उत्पादन देणाऱ्या सुधारित बियांचा वापर याचा अभाव आहे. तसेच खते व जंतुनाशके यांच्याही वापराचा प्रभाव कमी असल्याने शेतीची उत्पादकता कमी राहते. भारतात खतांचा वापर तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे. खतांच्या वाढणाऱ्या किमंती, सरकारकडून मिळणारे कमी अनुदान इ. मुळे शेतकऱ्याकडून कमी प्रमाणात खतांचा वापर केला जातो. पर्यायी शेतीची उत्पादकता कमी राहते.

6) भांडवलाचा अभाव–

भारतातील बहुतांश शेतकरी आपले जीवन दारिद्र्यरेषेखाली जगत आहेत. आपला उदरनिर्वाह चालवण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न शेतकऱ्या जवळ नाही. सरासरी शेतकऱ्यांचे उत्पन्न खूपच कमी आहे. शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी संस्थात्मक पतपुरवठा कमी केला जातो. बिगर संस्थात्मक पतपुरवठा च्या माध्यमातून शेती करावी लागते. यामध्ये जमीनदार, सावकार यांच्याकडून कर्ज घेतले जाते. अतिरिक्त व्याजदर यासारख्या घटनांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक होते. शेती करण्यासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होत नाही त्यामुळे शेती उत्पादकता कमी असते.

7) उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन–

भारतीय शेती ही शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन म्हणून ओळखले जाते.शेतकऱ्याकडून शेती करीत असताना ती व्यापारी तत्त्वावर केली जात नाही. व्यापारी शेती दृष्टिकोनाच्या अभावी उत्पादकता कमी राहते.

उपाय योजना–

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राची उद्योग सेवा क्षेत्र खुले झालेली दुरावस्था तसेच शेतीची घटलेली उत्पादकता सुधारण्यासाठी पुढील उपाय योजना करणे आवश्यक आहे.

1) जमिनीची धूप कमी करणे–

जमिनीची धूप थांबविण्यासाठी बांध घालणे,योग्य पिकांची लागवड करणे, संरक्षणात्मक झाडांची शेती,जमिनीत पाणी जिरविण्यासाठी खड्डे खोदणे, पिकांची योजना करून जमिनीवरील नत्र व इतर घटक वाढीसाठी प्रयत्न करणे. यातून जमिनीची धूप टाळता येईल व जमिनीची सुपीकता वाढवता येईल. पर्यायी शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

2) जलसिंचन सुविधा मध्ये वाढ करणे–

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी जलसिंचन सुविधांचा पुरवठा सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा, विहीर पुनर्बांधणी कार्यक्रम, धरणे बांधणे ,कूपनलिका, कालवे खोदणे ,जलसिंचनाच्या मोठ्या योजना ,नद्या जोडणी प्रकल्प इ.यासारख्या योजना मधून भारतीय शेतीला जलसिंचनाच्या कायमस्वरुपी सुविधा उपलब्ध करून दिल्यास शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी मदत होईल.

3) सेंद्रिय खतांचा वापर–

भारतीय शेतीची उत्पादकता कमी असण्याचे कारण नैसर्गिक व सेंद्रिय खतांचा अपुरा वापर होय. शेतीत रासायनिक खतांचा वापर कमी व्हावा व सेंद्रिय खतांचा वापर वाढावा यासाठी प्रोत्साहन दिले गेल्यास भारतीय शेतीची उत्पादकता वाढू शकेल. ग्रामीण भागात कचरा, टाकाऊ पदार्थ यांचा वापर करून कंपोस्ट खत तयार करून त्याचा खत म्हणून वापर करता येईल. त्याच बरोबर जनावरांच्या शेणा चा वापर करुण गोबर गॅस प्रकल्प कार्यान्वित करणे. त्यामुळे स्वयंपाकासाठी गॅस व नैसर्गिक खत सुद्धा उपलब्ध होईल. या सर्वांचा परिणाम शेती उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

4) सुधारित बी–बियाणांचा व कीटकनाशकांचा वापर करणे–

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी उच्च उत्पादन देणाऱ्या बि–बियाणांचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच पिकावर पडणाऱ्या रोगामुळे होणारी हानी टाळण्यासाठी कीटकनाशके व जंतुनाशके यांची पिकावर फवारणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना त्या संदर्भाने माहिती व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या सर्वांचा अनुकूल परिणाम शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल.

5) सक्षम वित्तपुरवठा–

शेती क्षेत्राला भांडवलाची गरज आहे. शेती क्षेत्राला लागणारा भांडवल पुरवठा संस्थात्मक व बिगर संस्थात्मक स्त्रोताच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना कमीत कमी व्याज दराने भांडवलाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल हे नाकारता येणार नाही. अशा रीतीने वरील प्रमाणे शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी उपायोजना करणे आवश्यक आहे.

1) Mishra & Puri –Indian Economy: Himalaya publishing house (1998)

2) Ruddar Datta, Sundaram K. P. M.: Indian Economy S. Chand & Company Limited, New Delhi–110055.

3) डॉ. भोसले काटे स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था फडके प्रकाशन कोल्हापूर 416012

4) डॉ. भालेराव देसाई भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन पुणे

5) भारताची आर्थिक पाहणी 2011-12,2012-13